Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भारताच्या परराष्ट्र धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**जाधव विश्वजीत हणमंतराव**
(एम.ए. राज्यशास्त्र, बी.एड्., सेट)
संशोधक

**डॉ. पी. डी. सूर्यवंशी**
मार्गदर्शक
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख
स्वा.सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय
पुर्णा जि. परभणी

**प्रस्तावना**

प्राचीन भारतीय इतिहासात रामायण, महाभारत ते गौतम बुद्ध, सम्राट अशोक, सम्राट चंद्रगुप्त मौर्य इत्यादी राजांच्या कारकीदीत भारताचे अतिपूर्वेकडील व शेजारील देशांशी कसे संबंध होते याचे विवेचन दिसून येते. त्यांच्या नियमित व्यापार, सांस्कृतिक व धार्मिक विचारांची देवाण-घेवाण सुरु होती. यासंबंधीचे अनेक दाखले इतिहासात पाहावयास मिळतात.

साधारणतः परराष्ट्र धोरणामध्ये प्रमुख दोन दृष्टीकोन प्रचलीत असतात. पहिल्या दृष्टीकोनानुसार परराष्ट्र धोरण हे संबंधित देशाच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक विचारप्रणालीचा केवळ आविष्कार असून त्यामध्ये देशाच्या वैचारिक बाबींचे प्रतिबिंब पडलेले दिसते. नेत्याला केवळ या वैचारिक परंपरेला मूर्त स्वरुप देण्याचे काम करावे लागते. दुसऱ्या दृष्टीकोनानुसार परराष्ट्र धोरण भौगोलिक, ऐतिहासिक परंपरा, देशाच्या आंतर्गत व बाह्य परिस्थितीचा विचार करुन घेतलेल्या निर्णयाचा परिणाम असतो. पहिला दृष्टीकोन हा आदर्शवादी विचाराचा तर दुसरा दृष्टीकोन व्यवहारवादी विचाराचे प्रतिनिधीत्व करतो. हे दोन्ही दृष्टीकोन परस्परापासून भिन्न असले तरी त्यामध्ये परराष्ट्र धोरणाच्या निश्चितीकरणामध्ये कोणत्या घटकाचे प्राबल्य आहे हाच मुख्य मुद्दा असतो. म्हणूनच कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरणात या दोन्ही दृष्टिकोनाचा सरमिसळ झालेला दिसून येतो. यामुळे परराष्ट्र धोरण ही एखाद्या नेत्यानी स्वतंत्रपणे केलेली केवळ निर्मिती नसून ती एक उत्क्रांत स्वरुपाची व सातत्याने विकसित होणारी प्रक्रिया असते. भारताचे परराष्ट्र धोरण प्राचीन काळात समृध्द असलेले दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारताच्या पराष्ट्र धोरणाची ब्रिटिशपूर्व स्थितीचा अभ्यास करणे.
२. भारताच्या पराष्ट्र धोरणाची ब्रिटिश कालीन स्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये विश्लेषणात्मक, ऐतिहासिक, सांख्यिकीय इत्यादी संशोधन पद्धती आहेत. तसेच भारताच्या परराष्ट्र धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी हा विषय ऐतिहासिक असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. भारताच्या पराष्ट्र धोरणाचा ऐतिहासिक वारस्यांचा आढावा खालील विविध मुद्यांच्या आधारे घेण्यात आला आहे.

**याज्ञवल्क्यस्मृती मधील परराष्ट्र धोरण**

याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये परराष्ट्र धोरणा संबंधात साम, राजनय, कुटनीती, सैन्याचा वापर यांचे विवेचन केले आहे. शत्रू दुर्बल असता व त्याच्या राज्यात पीके उभी असता हल्ला करावा असे सूचविले आहे. युध्दात मिळविलेली संपत्ती समर्थनीय मानली आहे. याज्ञवल्क्य् नुसार धर्मयुध्दावर भर दिला आहे. याज्ञवल्क्य् तत्वानुसार शरण आलेले, निशस्त्र असलेल्या सैनिकावर शस्त्र चालवू नये तसेच प्रेक्षकास उपद्रव पोहचवू नये. जिंकलेल्या मुलुखातील चालिरीती नियम कौटुंबिक प्रथा पुढे चालू ठेवाव्यात. असे विचार याज्ञवल्क्यमध्ये मांडले आहेत.

**महाभारतातील परराष्ट्र धोरण**

महाभारतात म्हटले आहे की, राजाचा शत्रु कोण व मित्र कोण हे ओळखले पाहिजे. शत्रूला पराभूत करण्यासाठी एकाच वेळी हल्ला करणे शहाणपणाचे नाही. शत्रूवर हल्ला करण्यापूर्वी त्यांचे मन जिंकणे, नजराणे देने, राजनयात कुशलता साधने आणि भेद निर्माण करने महत्त्वाचे मानले होते. दोन शत्रू असतील तर एकाच वेळी दोघांवर हल्ला न करता एका बरोबर मैत्रीचे संबंध ठेवून दुसऱ्यांवर हल्ला करावा. परंतु शत्रूवर विश्वास ठेवू नये. महाभारता म्हटले आहे की, राज्याराज्यातील संबंधात युध्द अनिवार्य आहे त्यामुळे राजाने सतत युद्धासाठी तत्पर असले पाहिजे. पुढे असेही म्हटले आहे की, राज्याचा खरा आधार केवळ विस्तृत मुलूखात व समृध्द कोषात नाही तर तो प्रजेच्या राज्यनिष्ठेत तसेच अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या संतोषात आहे. त्यामुळे राजाने युद्ध टाळून तह किंवा करारांच्या माध्यमातून मार्ग काढणे सोयीचे होईल.

**मनुस्मृतीतील परराष्ट्र धोरणविषयक विचार**

परराष्ट्र धोरणाविषयी मनुस्मृतीमध्ये म्हटले आहे की, परराष्ट्र धोरण नीतिविषयक तत्वांवरुन न ठरविता तत्कालीन परिस्थितीत काय उपयुक्त आहे यांचा विचार करून धोरण ठरविले जावे. राजाने आपल्या शेजारी राष्ट्राकडे व त्याच्या मित्रराष्ट्राकडे संभाव्य शत्रुराष्ट्र म्हणून पाहावे. अर्थात शेजारच्या शत्रुकडे संभाव्य मित्र म्हणून पहावे हे ओघानेच आले व या दोहोपलीकडील परराष्ट्राकडे उदासीन म्हणून पहावे. साम, दाम व भेद

अशा उपायाने आपली संप्रभुता लादण्याचा प्रयत्न करावा. शत्रूला चौहू बाजूने घायाळ करण्यासाठी मुलुखातील तळी, खंदक, तटबंदी, उध्वस्त करण्याला प्राधान्य दिले. अंतर्गत प्रशासनात व रासायनिक व लष्करी व्यवहारात हेराचा उपयोग विहित मानला आहे. एकंदरीत मनुस्मृतीमधील पराष्ट्र धोरणाविषयी राजाचे जे काही उद्दिष्टे निश्चित केली आहेत. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात छल कपट करण्याला प्राधान्य दिले आहे. म्हणजेच मनुस्मृतीचे धोरण दुसऱ्यांच्या संदर्भात पूर्णपणे द्वेषाने भरलेले दिसून येते.

**कौटिल्याचे परराष्ट्र धोरण**

कौटिल्याच्या काळी अनेक छोटे छोटे राज्य होते. असे छोटे छोटे राज्य जिंकूनच मौर्य साम्राज्य निर्माण झाले होते त्यामुळे राज्या राज्यातील संबंध त्यांचे विविध प्रकार कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये मंडल सिध्दांत रूपाने मांडले आहेत. कौटिल्याच्या परराष्ट्र धोरणा संबंधाचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावर पडलेला दिसून येतो.परराष्ट्र धोरणाचे बाबतीत कौटिल्याने म्हटले आहे की, शक्ती हेच बल व सुख हीच सिध्दी होय. याच्यापुढे जाऊन त्याने शक्तीचे ३ प्रकार पाडले आहेत. सल्लामसलतीतून व चर्चेतून निर्माण होणारी ती मंत्रशक्ती, भरलेल्या खजिन्यातून व प्रबल सैन्यातून निर्माण होणारी ती प्रभूशक्ती व सैनिकी शक्तीतून निर्माण होणारी ती उत्साह शक्ति होय. शक्ती व सुख यातील परस्परसंबंध विशद करतांना कौटिल्य म्हणतो की, शक्ती व सुख अधिक प्रमाणात उपलब्ध झालेला राजा इतर राजाहून श्रेष्ठ ठरतो. ही दोन्ही ज्याच्याकडे कमी प्रमाणात असेल तो कनिष्ठ ठरतो.[४] एकंदरीत कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात मंडल सिध्दांताच्या माध्यमातून परराष्ट्र धोरणाचे तत्कालीन पैलू व्यक्त केले आहेत. आज परिस्थिती बदलली असल्यामुळे त्यांचे हे धोरण उपयुक्त ठरत नाही. परंतु तत्कालीन परिस्थिती पाहता उपयुक्त असेच होते.

**गौत्तम बुद्ध यांचे परराष्ट्र धोरण**

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये युध्दनीतिचा त्याग करुन राज्याराज्यामधील संबंध व्यापक मानवतावादी दृष्टीकोनातून निर्धारीत करण्याची पर्यायी निती बुध्दीस्ट वाङ्मयात मांडलेली असून महात्मा गौतम बुध्द व सम्राट अशोक यांनी अहिंसा तत्त्वाला सर्व राजकीय व्यवहारात केंद्रस्थानी मांडले आहे. प्राचीन हिंदू आणि बौध्द तत्वज्ञानाप्रमाणेच अनेक संदर्भ आजच्या काळाशी जोडता येतात. भारताचा परराष्ट्र धोरणा बाबत वैचारीक वारसदारीचा आदर्शवादी आविष्कार गौतम बुध्दाच्या अहिंसावादी मानवतावादी व उदारमतवादी तत्वामध्ये दिसून येतो. एकंदरीत गौतम बुद्धाच्या परराष्ट्र धोरणाचाच भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडलेला दिसून येतो. कारण गौतम बुद्धाच्याच तत्वामध्ये शांतता, सहअस्तित्व, मानवतावाद, अहिंसा इत्यादी तत्वे दिसून येतात.

**मध्ययुगीन काळातील परराष्ट्र धोरण**

भारतात मध्यवर्ती व एककेंद्री सत्ता मोगल कालखंडात निर्माण झाली. इराण व मध्य आशियातील सत्ताधिशावर वचक ठेवणे, भारताच्या पश्चिम सीमाचा रक्षणासाठी अफगाणिस्तानवर लक्ष केंद्रीत करणे, संघर्ष करणे, राजनयिक क्षेत्रात देवाण-घेवाण करणे ही अकबर व अन्य मोगल सम्राटाच्या विदेशनीतिची उद्दिष्ट्ये होती. अफगाणिस्तानावर वर्चस्व प्रस्थापित करुन परकीय आक्रमकांना भारताच्या सीमेबाहेर प्रतिबंध करण्याचे चंद्रगुप्त मौर्याचे धोरण मोगल सम्राटाने पुढे चालविले विदेश नितीचा हा परंपरेचा हा वारसा पुढे चालविण्याचा प्रयत्न बिटिश सत्ताधिशांनी केला. अशाप्रकारे मध्ययुगात भारत अफगाणिस्तान संबंधाबाबत विदेशनीतिच्या परंपरा दृढ झालेल्या दिसून येतात.

**ब्रिटीश कालीन भारताचे परराष्ट्र धोरण**

ब्रिटिशांनी भारतीय उपखंडावर आपले आधिपत्य प्रस्थापित करुन व्यापारी सत्तेचा विस्तार करणे हे त्यांचे मुख्य धोरण होते. भारतीय उपखंडाबाबत परराष्ट्र धोरण निर्धारीत करुन त्याची कार्यवाही करण्याची जबाबदारी ब्रिटनमधील राजाची होती. त्याकाळात मध्य आशिया, इराणचे आखात, ब्रह्मदेश, मलेशिया या राष्ट्रात ब्रिटीश सत्तेचा विस्तार करण्यासाठी भारतातील सैन्यबळाचा उपयोगही करण्यात आला. इतकेच नव्हे तर रशिया व तुर्कस्थान संघर्षाचा प्रसंग, चीनमधील बॉक्सर बंडाचा प्रसंग, दक्षिण आफिक्रेतील बोअर युध्दाचा प्रसंग या सर्वामध्ये भारतीय सैन्यबळाचा उपयोग ब्रिटनने मोठ्या प्रमाणात केला. या सर्व घटनाच्या आधारे परराष्ट्र धोरणाबाबत के.एम. पण्णीकर म्हणतात की, "अफगाणिस्तान, तिबेट, सिक्कीम व ब्रह्मदेश या प्रादेशिक क्षेत्राच्या मध्यभागी भारत ही एक बलाढ्य सत्ता आहे. या बलाढ्य सत्तेचे दोन प्रमुख आधार आहेत ते म्हणजे कार्यक्षम प्रशासम यंत्रणा आणि युध्दाचा अनुभव असलेले सैन्यदल होय. एकंदरीत ब्रिटिशांनी भारतातील कौटिल्यांच्या परराष्ट्र धोरणाचा पुरेपूर उपयोग केलेला दिसून येतो.

दक्षिण आशियातील ब्रिटिश साम्राज्याच्या राजकीय व्यवस्थेचे प्रमुख केंद्रे म्हणून उदयास आले होते. त्यामुळे लॉर्ड डलहौसीचे मुख्य उद्दिष्ट्ये हिंदी महासागर क्षेत्रातून फ्रेंच प्रभावाचे समूळ उच्चाटन करण्याचे होते. तत्कालीन इंग्रज-फ्रेंच सत्तासंघर्षाचा तो अपरिहार्य परिणाम होता. याउलट लॉर्ड लिटन यांनी १८७७ मध्ये बलुचिस्थान ताब्यात घेऊन भारताच्या भूराजकीय हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी अफगाणिस्तान व इराणावर दबाव टाकला. पुढे लॉर्ड लिटनचा हा वारसा कालखंडात समर्थपणे चालविण्यात आला. १८८५ मध्ये लॉर्ड डफरिन यांनी उत्तर ब्रह्मदेश ताब्यात घेऊन संपूर्ण ब्रह्मदेशावर ब्रिटनचे स्वामित्व प्रस्थापित केले. १८८६ मध्ये सिक्कीमवर तिबेटने आक्रमण केल्यामुळे यात ब्रिटिशांनी हस्तक्षेप केला. तेव्हापासून भारत-चीन तिबेट असा संबंध निर्माण झाला आहे. नेपाळ, तिबेट, लडाख, भूतान, सिक्कीम व अरुणाचल प्रदेश या सर्व भागात भारताचे

हितसंबंध गुंतले आहेत. या सर्व भागाचे रक्षण करण्याच्या संदर्भात निर्धारीत करणे व धोरणाची कार्यवाही करणेही भारत सरकारची जबाबदारी आहे. असा भारतातील तत्कालीन ब्रिटिश शासकांचा दृष्टीकोन होता.

**ब्रिटिश शासनाच्या काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाची ठळक वैशिष्टये**

१. भारताच्या भूराजकीय हितसंबंधाची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना होती. भारतातील ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारताच्या हितसंबंधाचा पाठपुरावा सातत्याने केला.

२. भारताचे संरक्षण हे इजिप्तपासून इंडोचायनापर्यंत पसरलेल्या विशाल भूप्रदेशाशी व त्या क्षेत्रातील सागराशी संबंधित आहे. ह्या क्षेत्रात ब्रिटिश सत्ता सर्वश्रेष्ठ राहण्यावरच भारतीय उपखंडातील ब्रिटिश वसाहतीचे संरक्षण अवलंबून आहे. अशी ब्रिटनची स्पष्ट भूमिका होती.

३. बाह्य आक्रमणापासून भारताचा बचाव करण्याच्या दृष्टीने आक्रमणरोधक तटस्थ राष्ट्रांचे भारताच्या सभोवती एककडे असणे आवश्यक आहे असे ब्रिटिशकालीन भारताचे धोरण होते. या तटस्थ राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचे नियंत्रण, त्यांचे अंतर्गत स्थैर्य, संरक्षणासाठी आर्थिक व लष्करी मदत हा भारताच्या संरक्षणाचा आधार आहे असे भारतातील ब्रिटिश राज्यकर्त्यांचे धोरण होते.

४. भारतीय उपखंडातील वसाहतीचे साम्राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी युरोप खंडातील स्पर्धक देशांना या क्षेत्राबाहेर ठेवण्यावर ब्रिटनने भर दिला. तसेच परिस्थितीनुसार त्यांच्याशी संघर्ष अथवा तडजोड करण्याचे धोरण स्वीकारले.

**सारांश**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास केल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणावर दीर्घकालीन धोरणाचा परिणाम झाल्याचे दिसून येते. याज्ञवल्क्यस्मृती मधील परराष्ट्र धोरण, महाभारतातील परराष्ट्र धोरण, मनुस्मृतीतील परराष्ट्र धोरणविषयक विचार, कौटिल्याचे परराष्ट्र धोरण, गौत्तम बुद्ध यांचे परराष्ट्र धोरण आणि मध्ययुगीन काळातील परराष्ट्र धोरण म्हणजेच भारतातील कालपरत्वे तत्कालीन सत्ताचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम झाला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर गौत्तम बुद्ध कालीन परराष्ट्र धोरणाचा अनेक वेळेला उल्लेख केला जात असल्याचे दिसून येते. तसेच ब्रिटिश काळातील भारताबदलच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेतल्यानंतर असे स्पष्ट होते की, भारताचे शेजारी राष्ट्रांशी व पश्चिम आशिया राष्ट्रांशी काही हितसंबंध स्थायी स्वरुपाचे आहेत तर काही हितसंबंध हे परिस्थितीनुसार बदलत्या स्वरुपाचे आहेत हे लक्षात घेऊन ब्रिटिशांनी वास्तववादी परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला असल्याचे दिसून येते.

**संदर्भग्रंथ**

१. Sharma, C. P.(ed.): Power and Peace, Kitab Ghar Publications, New Delhi, २०००
२. Atal Bihari Vajpayee, “Indias Experience Has Taught That Peace Lies in Strength”, The New York Times, September 21, 2000,
३. Atal Bihari Vajpayee, “Indias Experience Has Taught That Peace Lies in Strength”, The New York Times, September 21, 2000,
४. Nalini Kant Jha, Domestic Imperatives in Indias Foreign Policy, South Asian Publishers, New Delhi, 2002
५. India‘s Nuclear Weapons Programme, Operation Shakti 1998, for details see http://nuclearweapon archive.org/India Shakti.html, (as accessed on 20 March, 2016)
६. Sondhi, M L and Nanda, Prakash., Vajpayees Foreign Policy: Daring the Irreversible, Har-Anand Publications, New Delhi, 1999
७. Nehru, J. L.: Speeches 1949-56, Publishing Division, Govt. of India. New Delhi, 1951
८. Gandhi, Indira: Selected Speeches, Vol. 1, Jan. 1966, Aug. 1969, Govt. of India, New Delhi, 1971